# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. ११५ /2024

**विषय : संशोधन मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्याबाबत.**

**संदर्भ : विद्यापीठाचे परिपत्रक क्र. 45/2024 दिनांक: 06/03/2024**

मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग व मा. प्राचार्य/संचालक सर्व संशोधन केंद्र यांना कळविण्यात येते की, आगामी पीएच्.डी. प्रवेश परीक्षा (पेट) आयोजित करण्याच्या अनुषंगाने पीएच्.डी. मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. जागा अद्ययावत करताना संशोधन केंद्र व संशोधन मार्गदर्शकांनी उपरोक्त संदर्भीय परिपत्रकामधील मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करावी. ज्या संशोधन मार्गदर्शकांनी यापूर्वी त्यांच्याकडील रिक्त जागा अद्ययावत केल्या आहेत किंवा ज्या संशोधन मार्गदर्शकांकडे सद्यस्थितीत जागा रिक्त झाल्या आहेत किंवा ज्या संशोधन मार्गदर्शकांना नव्याने संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे. अशा मार्गदर्शकांना पुन:श्च किंवा नव्याने जागा अद्ययावत करावयाच्या आहेत, त्या संशोधन मार्गदर्शकांनी त्यांच्या लॉगीनमधून त्यांच्याकडील रिक्त जागा अद्ययावत कराव्यात. तद्नंतर संबंधित संशोधन केंद्रांनी त्यांचे मार्गदर्शकाकडील पुन:श्च किंवा नव्याने अद्ययावत केलेल्या रिक्त जागांना प्रवर्गनिहाय ऑनलाईन पध्दतीने मान्यता द्यावी. ही सर्व प्रक्रिया दि. 10 जून, 2024 पर्यंत पूर्ण करावी.

ज्या संशोधन मार्गदर्शकांनी यापूर्वी त्यांच्याकडील रिक्त जागा अद्ययावत केल्या आहेत परंतु त्यांना जागा अद्ययावत करण्याची आवश्यकता वाटत नाही, अशा संशोधन मार्गदर्शकांनी रिक्त जागा अद्ययावत करण्याची आवश्यकता नाही.

सदर प्रक्रिया पूर्ण करताना काही तांत्रिक अडचण आल्यास, प्रशासकीय भवन, पहिला मजला येथील आय. टी. सपोर्ट संपर्क क्र. 020-71533633 अथवा phdtracking_support@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा.

गणेशखिंड, पुणे 411007 )
संदर्भ: शै.प्रवेश/ 1656 )
दिनांक: 31/05/2024)

31/5/2024
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
2. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील /संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करावी.

D:\PET 2023\Circulars.docx